| जे का रंजले गांजले || त्यांसी करूया आपुले ||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे

**वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

दिनांक- 14 जानेवारी, 2025

## सूचना

वरिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत समाजशास्त्र विभाग आयोजित शुक्रवार दि.17 जानेवारी, 2025 रोजी सकाळी 9.00 वाजता ले. हॉ 21 मध्ये **'सायबर सुरक्षा आणि महिला कायदे'** या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित रहावे.

प्राचार्य

A

**| जे का रंजले गांजले || त्यांसी करूया आपुले ||**

**श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे**

**वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

**समाजशास्त्र विभाग- 2024-25**

**आणि**

**बाळासाहेब देसाई  कॉलेज, पाटण ( अग्रणी महाविद्यालय)**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्र**

**सायबर सुरक्षा आणि महिला कायदे**

**कार्यक्रमपत्रिका**

| | | |
|---|---|---|
| स्वागत व प्रास्ताविक & परिचय | : | प्रा. आर.पी . पवार |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : | मा. डॉ. अखिलेश शिंदे<br>(समाजशास्त्र विभाग, महिला कॉलेज, कराड) |
| विषय | : | सायबर सुरक्षा आणि महिला कायदे |
| अध्यक्षीय मनोगत | : | मा. डॉ. श्रीमती. एस. आर. सरोदे<br>(प्र. प्राचार्य, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड) |
| आभार | : | सुमित वाघमारे |
| सूत्रसंचालन | : | कु. आकांक्षा पाटील |

वार व दिनांक : 17 जानेवारी  2025

स्थळ : ले. हॉ. नं. 21    वेळ: सकाळी 9.00 वाजता

| जे का रंजले गांजले || त्यांसी करूया आपुले ||

**श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे**

**वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

**समाजशास्त्र विभाग- 2024-25**

**&**

**बाळासाहेब देसाई  कॉलेज, पाटण ( अग्रणी महाविद्यालय)**

**(एक दिवसीय चर्चासत्र)**

**विषय: सायबर सुरक्षा आणि महिला कायदे**

---

## अहवाल- 2024-25

वेणूताई चव्हाण कॉलेज कराड  समाजशास्त्र विभाग व बाळासाहेब देसाई  कॉलेज, पाटण (अग्रणी महाविद्यालय) यांच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विभाग अंतर्गत शुक्रवार दि.17 जानेवारी, 2025 रोजी सकाळी 9.00 वाजता ले. हॉ 21 मध्ये ‘सायबर सुरक्षा आणि महिला कायदे’ या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते.  ‘सायबर सुरक्षा आणि महिला कायदे’ या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयावर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मध्ये माहिती तंत्रज्ञान कायदा - 2000 व सायबर सुरक्षा विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महिला कॉलेजचे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अखिलेश शिंदे यांना साधन व्यक्ती म्हणून आमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्या, डॉ. एस.आर. सरोदे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा आर.पी.पवार यांनी केले. प्रा.आर पी पवार यांनी आपल्या स्वागतपर भाषणात समाजशास्त्र विभागाची व विभागाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची माहिती

दिली. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. अखिलेश शिंदे यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. सरोदे यांनी केला.

साधन व्यक्ती प्रा. डॉ. अखिलेश शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातं डिजिटल स्पेस मध्ये सायबर सुरक्षा आणि महिला कायदे या विषयीचे महत्व विशद करताना म्हणाले की, डिजिटल स्पेसमध्ये सायबर सुरक्षा आणि महिला कायदे हे सुरक्षित आणि समतापूर्ण ऑनलाइन वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. सायबर सुरक्षा संवेदनशील माहितीचे अनधिकृत प्रवेशापासून संरक्षण करण्यास मदत करते, व्यक्ती आणि संस्थांसाठी गोपनीयता आणि सुरक्षितता सुनिश्चित करते. सायबर धोक्यांच्या वाढत्या प्रमाणात आणि गुंतागुंतीमुळे, सेवांमध्ये व्यत्यय आणणारे, डेटा चोरणारे आणि आर्थिक नुकसान करणारे हल्ले रोखण्यासाठी मजबूत सायबर सुरक्षा उपाय आवश्यक आहेत. व्याख्यानात ते म्हणले की , महिलांना सायबर छळ, पाठलाग आणि गैरवापरापासून संरक्षण देण्यासाठी कायदे आणि नियम अस्तित्वात आहेत, ज्यामुळे ऑनलाइन वातावरण सुरक्षित होते. डिजिटल जागा महिलांना संसाधने, शिक्षण आणि स्व-अभिव्यक्ती आणि सक्षमीकरणाच्या संधी प्रदान करतात.भारतातील माहिती तंत्रज्ञान कायद्यासारखे विविध कायदे महिलांवरील सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर चौकट प्रदान केली आहे. प्राचार्य डॉ. एस. आर. सरोदे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, आपण सर्वांनीच सायबरसुरक्षेला प्राधान्य देऊन आणि डिजिटल जागेत महिला कायदे मजबूत करून प्रत्येकासाठी अधिक सुरक्षित वातावरण आणि समावेशक आणि सक्षम डिजिटल जग निर्माण करण्याची गरज आहे. या कार्यशाळेत महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचे बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी साधन व्यक्तीची स्त्रीभ्रूण हत्या या विषयावर विविध प्रश्न विचारून चर्चा केली व साधन व्यक्तींनी समाधानकारक अशी उत्तरे दिली. समाजशास्त्र विभागातील विद्यार्थिनी आकांक्षा पाटील हिने सूत्रसंचालन केले व समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी सुमित वाघमारे यांनी कार्यक्रमातील उपस्थितांचे व साधन व्यक्तीचे आभार व्यक्त केले. चर्चासत्र यशस्वीपणे संपन्न झाले.

एक दिवसीय चर्चासत्र- शुक्रवार दि.17 जानेवारी, 2025

विषय: सायबर सुरक्षा आणि महिला कायदे

साधन व्यक्ती प्रा. डॉ. अखिलेश शिंदे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एस. आर. सरोदे.




चर्चासत्रामध्ये प्रास्ताविक आणि स्वागत करताना प्रा. आर. पी. पवार



मार्गदर्शन करताना साधन व्यक्ती प्रा. डॉ. अखिलेश शिंदे



मार्गदर्शन करताना साधन व्यक्ती प्रा. डॉ. अखिलेश शिंदे



चर्चासत्रास उपस्थित विद्यार्थी




चर्चासत्रास उपस्थित विद्यार्थी

